| | | |
|---|---|---|
| | **दिघी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड**<br>**वडमुखवाडी ता हवेली जि पुणे.** | |
| | प्रेसनोट | दिनांक ०३/०२/२०२३ |

**पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे शहर आयुक्तालयात व पुणे ग्रामिण मधिल गाईंना इंन्जेक्शन देवुन त्यांना बेशुदध करुन त्यांची कत्तल करुन घेवुन जाणाऱ्या टोळीला दिघी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाकडुन ०६ आरोपींना अटक करुन एकुण २५,२०,९८०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन एकुण १३ गुन्हे उघड केलेबाबत....**

---

दिघी पोलीस ठाणे येथे गु. रजि नं. ४८४/२०२२ भा. द. वि कलम ४२९, ३७९, ४११, ३४ सह प्राणि संरक्षण अधिनियम सुधारण सण २०१६ चे कलम ५, ५(अ), ५(ब), ६, ९ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(अ).१३५ अन्वये तसेच पिंपरी चिंचवड आयुक्तालयात गाईंना इंन्जेक्शन देवुन त्यांना बेशुदध करुन त्यांची वाहतुन करुन त्यांची कत्तल करण्यासंदर्भात गुन्हे घडलेले होते. सदर गुन्हयांचा तपास करणे बाबत मा. पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड यांनी आदेशीत केले होते. सदरचा तपास चालु असताना चालु असताना दि. २८/१२/२०२२ रोजी पोउनि भदाणे, पोहा १०२० कांबळे, पोना १६६५ नवघिरे, पोना १२५५/दौंडकर, पोशि २५५८/शिंदे असे पोलीस ठाणे हद्दीत गस्त करत असताना दिघी आळंदी रोडवर एक संशईत विना नंबरीची एन्जॉय कार फिरताना दिसली गाडीचा पाठलाग केला असता गाडीतील चार इसम त्यांच्या ताब्यातील गाडी पंचशिल बुद्ध विहारच्या मागे, शिवनगरी कॉलणी कच्चा रस्ता दिघी येथे सोडुन बाजुच्या टाटा कम्युनिकेशनच्या जंगलात पळुन गेले होते. सदरची गाडी गाईंची वाहतुक करत असल्याचा संशय आल्याने जप्त करण्यात आली होती. गाडीच्या इंजीन नंबर वरुन मालकाची आरटीओ कडुन माहिति करुन दि. १६/०२/२०२२ रोजी गाडी क्रं. एमएच ०१ बीके १६६१ याचा मालक अशोक कोंडीबा जगताप, रा. बदलापुर प. यांचे गाडीकडे चौकशी केली असता सदरची गाडी ०६ वेगवेगळया इसंमाना विक्री केल्याचे माहिति मिळाली. तसेच सदरची गाडी मोशिन बाबु कुरेशी रा मिरारोड याचेकडे असल्याचे तपासात निष्पन्न झाले. दि १९/०१/२०२३ रोजी मोशिन कुरेशी याचा मिरारोड, काशिमीरा, नयानगर, येथे शोध घेतला असता ते मिळुन आले नाही. मोशिन कुरेशी यांचा मोबाईल क्रंमांक प्राप्त करुन पोउनि भदाणे् यांनी आरोपीच्या मोबईल नंबरचे तसेच त्याचे साथिदारांचे मोबाईल नंबरचे सिडीआर तसेच घटनास्थळावरील डम्प डाटा तसेच घटनास्थळाचे आजुबाजुच्या परीसरातील डम्प डाटाचे तांत्रिक विश्लेशन करुन पाहीजे आरोपी यांचे तसेच त्यांचे साथिदारांचे नावे निष्पन्न केली.

दि. २८/०१/२०२२ रोजी तपास पथकाने पाहिजे आरोपी यांचा मोबाईल क्रंमांक यावरुन आरोपी याचा कुसेगाव काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत शोध घेत असताना लोकेशनच्या जवळ एक इन्होवा गाडी संशईत रित्या उभी असलेली दिसली. आम्ही आरोपीचा परीसरात शोध घेत असताना संशईत इन्होवा एक अनोळखी इसम भरधाव वेगाने घेवुन जाताना दिसला मो/सायकलवरुन आरोपीचा पाठलाग केला असता सदरचा इसम त्यांचे ताब्यातील मो/कार पश्चिम द्रुतगती मार्गाने रस्त्याचे विरुदध दिशेने घेवुन घोडबंदर रोडच्या दिशेने जाताना दिसला. त्याचा पाठलाग करुन हशीम मोहम्मद कुरेशी, वय २१ वर्षे यास इन्होवा गाडी क्रं. एमएच ०६ एएल ०६९९ हिच्यासह ताब्यात घेतले. त्यानंतर हशीम कुरेशी याचेसोबत जावुन पाहीजे आरोपी आरीफ कुरेशी व अशरफ कुरेशी यांचा शोध घेण्यासाठी नयानगर पोलीस ठाण्याचे शोध घेत असताना पुजा नगर मिरारोड येथे अशरफ कुरेशी रस्त्याने जाताना दिसला त्याला थांबण्याचा इशारा केला असता तो पळुन गेला त्यास पाठलाग करुन ताब्यात घेतले. मोहम्मद आरीफ सुलेमान कुरेशी वय ५१ वर्षे, यास ताब्यात घेतले. त्यानंतर पाहिजे आरोपी मो. शाईद सुलेमान कुरेशी वय ४२ वर्षे, व मोसिन बाबु कुरेशी, वय २८ वर्षे, यांचा मिळुन आले असता त्यांना ताब्यात घेतले. एकुण ०५ आरोपी यांना दि. २९/०१/२३ रोजी अटक केली असता त्यांना दि. ०३/०२/२३३ रोजी पर्यंत पोलीस कोढडी सुनावली होती. अटक आरोपी यांचे मदतीने दि. ०१/०२/२३ रोजी मुंबई येथे जावुन पाहिजे आरोपी साहेल मो. फारुक कुरेशी, वय ३३ वर्षे, धंदा मांसविक्री, यांचा माहिम येथे शोध घेतला असता तो एक्सयुव्ही ५०० कार क्रं. एम क्रं. ०४ एफझेड ८४७८ या वाहनासह मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेतले तसेच गाडीत गाईंची कत्तल करण्यासाठी वापरेलेले साहित्य ३ कोयते व २ सत्तुर व इंन्जेक्शन मिळुन आले. आरोपी अटक करण्यात आली असुन त्यास दि. ०७/०२/२३ पर्यंत पोलीस कोढडी सुनावली आहे.

<u>अटक आरोपीकडुन एकुण २५,२०,९८०/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.</u>

५,००,०००/- रू. कि. ची सेरोलेट कंपनीची इन्जॉय सिल्व्हर रंगाची कार नं. एम.एच-०१-बी-के-१६६१ २) १०,००,०००/- रू. कि. ची टोयोटा कंपनीची इनिव्हा सिल्व्हर रंगाची त्याचा नं. एम.एच०६-ए.एल-०६९९ ३) १०,००,०००/- रू. कि. ची एक्स यु

व्ही-५०० कार नं. एम.एच-०४-एफ.झेड-८४७८ ४) दोन लोखंडी सत्तुर ५) तीन लोखंडी कोयते ६) नायलॉनच्या दोन लांब रस्सी ७) लोखंडी कानस ८) निळया रंगाच्या पिशव्या ९) रिकाम इंजेक्शन १०) औषधाची काचेची बाटली ११) नंबर प्लेट.

**अटक आरोपी यांचेकडुन खालीलप्रमाणे एकुण १३ गुन्हे उघड करण्यात आले आहे.**

१) दिघी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गु. रजि नं. ४८४/२०२२ भा. द. वि कलम ४२९, ३७९, ४११, ३४ सह प्राणि संरक्षण अधिनियम सुधारण सण २०१६ चे कलम ५, ५(अ), ५(ब), ६, ९.

२) दिघी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुरक्रं. ३७६/२२ भादवी कलम ४२९, ३७९.

३) दिघी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुरक्रं. ५१/२३ भादवी कलम ३७९, ४२९, ३४ सह महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम सुधारण सण २०१६ चे कलम ५, ५(अ), ६ व ९.

४) पिंपरी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुरक्रं. ८५५/२२ भादवी कलम ३७९ सह महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम सुधारण सण २०१६ चे कलम ५(अ)(१)(क), ९, ९(अ) .

५) पिंपरी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुरक्रं. १०१९/२२ भादवी कलम ३७९,४२९ सह महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम सुधारण सण २०१६ चे कलम ५(क), ९(अ).

६) पिंपरी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुरक्रं. ७९०/२२ भादवी कलम ३७९.

७) भोसरी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुरक्रं. ७५२/२२ भादवी कलम ३७९,३४ सह महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम सुधारण सण २०१६ चे कलम ५, ५(अ), ९.

८) भोसरी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुरक्रं. ४१६/२१ भादवी कलम ४२९, ३४ सह महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम सुधारण सण २०१६ चे कलम ५, ५(अ),६, ९.

९) देहुरोड पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुरक्रं. ५१९/२२ भादवी कलम ४२९,३४

१०)वाकड पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड आयुक्तालय गुरक्रं. ११०७/२२ भादवी कलम ३७९, ४२९ सह महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम सुधारण सण २०१६ चे कलम ५(क), ९(अ).

११)खेड पोलीस ठाणे पुणे ग्रामिण गुरक्रं. ७७/२२ भादवी कलम ३७९.

१२)कोंढवा पोलीस ठाणे पुणे शहर आयुक्तालय गुरक्रं. १५/२३ भादवी कलम ३७९.

१३)हडपसर पोलीस ठाणे पुणे शहर आयुक्तालय गुरक्रं. १६०१/२२ भादवी कलम ४२९ सह महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियम सुधारण सण २०१६ चे कलम ५(क), ९(अ), (ब).

**सदरच्या कारवाईत एकूण २५,२०,९८०/- रू किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुन्हयातील ०९ आरोपींची नावे निष्पन्न करून काशिमीरा, मिरारोड, नयानगर, माहिम मुंबई येथुन एकुण ०६ आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

१)मोशीन बाबु कुरेशी, वय २८ वर्षे, रा. मिरारोड, काशिम गोडसा बाबा दर्गा रोड काशिमिरा ठाणे
२)मोहम्मद शाहिद रहेमान सुलेमान कुरेशी, वय ४२ वर्षे, रा. मिरारोड, माशिमिरा गोडसाबाबा दर्गा जवळ, ठाणे
३) हाशिम मोहम्मद अब्दुल रहेम कुरेशी, वय २१ वर्षे, रा. मिरारोड, माशिमिरा गोडसाबाबा दर्गा जवळ, ठाणे
४) अशरफ सुलेमान कुरेशी, वय ३२ वर्षे, रा. मिरारोड, पुजानगर, केजीएन टॉवर रुम नं. ४०३, मिरारोड, ठाणे
५) मोहम्मद अरिफ सुलेमान कुरेशी, वय ५२ वर्षे, रा. मिरारोड, पुजानगर, केजीएन टॉवर रुम नं. ४०३, मिरारोड, ठाणे
६) सोहेल मो. फारुक कुरेशी, वय ३३ वष,धंदा मांसविक्री, रा पिएमजीपी कॉलणी, बिल्डींग नं ०६/४१०, धारावी डेपो जवळ, मुबई यांना ता. २९/०१/२०२२ रोजी अटक करण्यात आली असुन ता. ०३/०२/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी मंजुर केली आहे. सदर गुन्हयाचा पुढिल तपास पोउपनि भदाणे हे करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड श्री. विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त सो, श्री. मनोजकुमार लोहीया, मा. अप्पर पोलीस आयुक्त सो, डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उपायुक्त सो, परीमंडळ ०१, श्री. विवेक पाटील मा. सहायक पोलीस आयुक्त सो, चाकण विभाग, श्रीमती प्रेरणा कट्टे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, दिघी पोलीस ठाणे श्री. दिलीप शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली दिघी पोलीस ठाण्याचे तपास पथकातील सुनिल भदाणे, पोलीस उप निरीक्षक, पोहा ७१३ चिंतामण फलके, पोहा ८०१ प्रदीप पोटे, पोहा १०२० किशोर कांबळे, पोहा ११६८ सतीष जाधव, पोना १५७१ बाळासाहेब विधाते, पोना १५७२ किरण जाधव, पोना १६६५ नवधिरे, पोना १२५५/दौंडकर, पोशि २०१२ रामदास दहीफळे, पोशि २०९४ बाबाजी जाधव व पोशि २५५८/शिंदे यांनी तसेच मपोना १६२०/भागश्री जमदाडे पोलीस उपायुक्त कार्यालय परी.०१ यांनी केली.

३/२/२३

वरिष्ठ पोलिस निरीक्षक
दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड